# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

---

**(Extra Ordinary)**
**Monday, 03 January, 2022**


## DIRECTION

No. 01/ 2022 Dated: 03/01/2022

**Subject : System, Procedure, Criteria, Assessment, Declaration of Results, Modus-Operandi thereof, Remuneration, etc., for conduct of Winter-2021 examinations of all Regular / Ex / External (Ex) students in all faculties of the University, Direction-2021.**

Whereas, Section-5(20) of Maharashtra Public Universities Act, 2016 prescribes the powers & Duties of the University to Institute Degrees and Post-Graduate Diplomas, Certificates, etc. based on examinations or by other tests or otherwise,

AND

Whereas, to discharge the duties under this Section-5 of the Act, mentioned above, Sub-section 81 of the said Section-5, Prescribes that University has to comply with and carry-out any directives issued by the State Govt. from time to time, with reference to above powers, duties and responsibilities of the University,

AND

Whereas, the examinations are to be conducted under the Ordinances, U/s 73 of the Act, for which Ordinance No.6, 9, 18/2001, 19/2001 and 21/2001 are in existence, as per which the University conducts the examinations in normal circumstances,

AND

Whereas due to COVID-19 Pandemic in the State and the Country, the situation is resulting in No-good impact on every part of normal life including Education sector, affected the conduct of examinations of Winter-2021, assessment of answer-books of Theory examinations, conduct of practical, Viva-voce, etc. of students, admitted to Winter-2021 examinations and declaration of results thereof,

AND

Whereas, due to COVID-19 Pandemic, it is found difficult to hold the examinations of Winter-2021 under normal course by following the concerned Ordinances/Directions/Regulations of the examinations / Courses etc., in existence by adhering to their provisions.

AND

Whereas, the Academic Council in its meeting held on 29.11.2021 & the Board of Examinations in its meeting held on 30.11.2021 has accepted the System, Procedure, Criteria, Assessment, Declaration of Results, Modus-Operandi thereof, Remuneration, etc., for conduct of Winter-2021 examinations of all Regular / Ex / External (Ex) students in all faculties of the University.

AND

Whereas, the Hon'ble Vice-Chancellor have accepted the rates of remuneration for conduct of Winter-2021 examinations, u/s 12(7) of the Maharashtra Public Universities Act on behalf of the Management Council on 13/12/2021.

AND

Whereas, changes in Criteria, Procedure, System, Assessment, Declaration of Results, Modus-Operandi, Remuneration etc., for conduct of Winter-2021 examinations are taking place as compared to existing Ordinances/Directions of Examinations and Regulations/Directions for courses of Studies, etc.

AND

Whereas, it is a subject matter of Ordinance, prescribing of which is a time-consuming process,

Now, therefore, I, Dr. Vilas M. Bhale, Vice-Chancellor, Sant Gadge Baba Amravati University, in the exercise of powers vested in me under Section 12(8) of Maharashtra Public Universities Act, 2016 do hereby directs as under:

1) This Direction may be called, ñSystem, Procedure, Criteria, Assessment, Declaration of Results, Modus-Operandi thereof, Remuneration, etc., for conduct of Winter-2021 examinations of all Regular / Ex / External (Ex) students in all faculties of the University, Direction-2021.ò

2) This Direction shall come into force from the date of its issuance and be operative exclusively and only for Winter-2021 examinations.

3) In this Direction, unless the context otherwise requires :
   (i) ñRegular Studentsò means, the ñRegular Studentsò who have been admitted to the Colleges/Model Colleges and University Teaching Departments in Academic Session 2021-22 and found eligible for Winter-2021 examinations in all the faculties.
   (ii) ñEx Studentsò means, the unsuccessful students of previous examinations who have been admitted now for Winter-2021 examinations in all the faculties.
   (iii) ñExternal (Ex) Studentsò means, the previously admitted external students who have been now eligible for appearing sub-sequent examinations.

4) Notwithstanding, the provisions regarding the criteria and the procedure as laid down in the Ordinances for Examinations in General for Conduct of Examinations (theory, practical, viva-voce etc.), Evaluation and Moderation of Answer Books, the appointment of paper setters/examiners etc. viz Ordinance No.6, 9, 19/2001 and 21 of 2001, etc., ñthe System, Procedure, Criteria, Assessment, Declaration of Results, Modus-Operandi thereof, Remuneration, etc., for conduct of Winter-2021 examinations of all Regular / Ex / External (Ex) students in all faculties of the Universityò shall be as per Appendix-I appended with this Direction.

5) Mode and Criteria for Practical/Project/Dissertation/Viva-voce examinations as per their applicability to Winter-2021 examinations, shall be as given in Appendix-I, भाग-१, Para-(ड) for all Regular/Ex/External (Ex) Students.

6) The results shall be declared, after the approval of the Special Examination Committee as provided in Original Ordinance No.9.

7) Remuneration for the said Winter-2021 examinations and expenditure to be incurred for precautions against COVID-19 shall be paid as per provisions in Appendix-I भाग-२, Para-(ड).

8) Precautions shall be taken as per Guidelines given by Government / University to protect from COVID-19 virus in respect of all persons related to the examinations and as instructed in the Appendix-I, भाग-२, Para-(अ).

9) Further instructions to be issued in the light of this Direction or as the case may be, shall be followed by all concerned.

10) Benefits of Grace/Condonation of marks etc., shall be granted under Ordinance 18/2001. Benefits of Incentive Marks shall be granted under Ordinance No. 1/1985 as amended from time to time, shall be given.

Sd/-

Dated: 29/12/2021

(Dr.V.M.Bhale)
Vice-Chancellor
Sant Gadge Baba Amravati University.

*****

**Appendix-I**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील हिवाळी-२०२१ विद्यापीठ परीक्षांच्या आयोजनाबाबत
## भाग-१

### अ) परीक्षा पद्धती :-

१) हिवाळी-२०२१ परीक्षेकरीता सर्व संलग्नीत महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा ही परीक्षा केंद्र म्हणुन राहतील.

२) हिवाळी-२०२१ परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन यापैकी कोणत्या पद्धतीने द्यावयाची आहे, याबाबतची विचारणा संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/मॉडेल डीग्री कॉलेज (बुलढाणा) यांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा सुरू होण्याच्या एक आठवडा आधी करावी व त्यानुसार परीक्षेचे नियोजन करावे.

३) बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात तयार करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांचे नियमन (मॉडरेशन) केल्या जाईल.

४) हिवाळी-२०२० व उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात तयार केलेल्या प्रश्नपत्रिका ज्या उपयोगात आलेल्या नाहीत, अशा प्रश्नपत्रिकेचा एक संच व नव्याने दोन संच प्राश्निकांकडून तयार करुन घेण्यात यावे. असे एकुण तीन प्रश्नसंच राहतील. तसेच ज्या प्रश्नपत्रिकांचे बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात प्रश्नसंच उपलब्ध नाहीत, अशा विषयांचे तीन प्रश्नसंच मागविण्यात यावे. प्राश्निकांच्या नावांच्या याद्या संबंधीत अभ्यास मंडळाचे अध्यक्षांकडून घेण्यात याव्यात.

५) हिवाळी-२०२१ परीक्षेकरीता विद्यापीठाद्वारे महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागांना/मॉडेल डीग्री कॉलेज बुलढाणा यांना प्रचलित पद्धतीनुसार प्रवेशपत्रे, रोललिस्ट, ग्रीन व ब्लॅक कंट्रोल शिट्स इत्यादी ऑनलाईन परीक्षेकरीता पोर्टलवर तसेच ऑफलाईन परीक्षेकरीता हार्ड कॉपी पुरविण्यात याव्यात.

६) शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील हिवाळी-२०२१ च्या विषम सत्रांच्या परीक्षा तसेच अंतिम वर्ष / अंतिम सत्राच्या परीक्षा महाविद्यालयांनी/विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज बुलढाणा यांनी विद्यापीठाद्वारे जाहीर वेळापत्रकानुसार व विद्यापीठाने पुरविलेल्या प्रश्नपत्रिकेनुसार घ्यावयाच्या आहेत.

७) अ) सदर परीक्षेकरीता विद्यापीठाद्वारे जाहीर वेळापत्रकानुसार प्रत्येक दिवसाच्या परीक्षेचे एक दिवस आधी प्रश्नपत्रिका व Answer-Key विद्यापीठाद्वारे प्राचार्यांचे/विभाग प्रमुखांचे/मानद संचालकांचे अधिकृत ई-मेल वर पाठविण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका ह्या प्रश्नपत्रिका मुद्रकाकडून सरळ महाविद्यालयांचे ई-मेलवर पाठविण्यात येतील (Printer to Center).
ब) विद्यापीठाकडून प्राप्त प्रश्नपत्रिकांची Online link तयार करून विद्यार्थ्यांना पाठविण्याची व्यवस्था महाविद्यालयांना / विद्यापीठ शैक्षणिक विभागांना / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढणा यांना करावी लागेल व हीच प्रश्नपत्रिका ऑफलाईन परीक्षा देवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांकरीता उपयोगात आणावी. ऑनलाईन प्रश्नपत्रिकांची link विद्यार्थ्यांना पुरवितांनाच विद्यापीठाच्या या WhatsApp No.9356800673 वर पाठविण्यात यावी.

८) महाविद्यालयांना / विद्यापीठ शैक्षणिक विभागांना / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढणा यांना एक दिवस अगोदर पाठविण्यात येणा-या प्रश्नपत्रिका व Answer-Key यांची गोपनीयता राखण्याची तसेच विद्यापीठाद्वारे जाहिर वेळापत्रकामध्ये नमूद वेळेनुसार परीक्षेचे संचालन करणे, याची जबाबदारी प्राचार्यांची/केंद्राधिका-यांची/विभाग प्रमुखांची/मानद संचालकांची राहील.

९) शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील हिवाळी-२०२१ च्या सम सत्रांच्या (अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून) परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांच्या स्तरावर घ्यावयाच्या आहेत, त्याकरीता वेळापत्रक व बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात प्रश्नपत्रिका महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागांना/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांना त्यांचे स्तरावर ñप्रश्नपत्रिकेचे स्वरुप व सोडविण्याबाबतची माहितीò या शिर्षांतर्गत दर्शविल्याप्रमाणे तयार करावयाच्या आहेत.

१०) ज्या जून्या अभ्यासक्रमांना नियमित विद्यार्थी प्रवेशित नाहीत अशा अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर संचालित करण्यात याव्यात.

११) विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या ऑफलाईन प्रश्नपत्रिकांमध्ये प्रत्येक प्रश्नाखाली चार पर्याय दिलेले राहतील, त्यावर विद्यार्थ्यांनी योग्य उत्तरास बरोबर (ã) अशी खूण करावी.

१२) विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने सोडविलेल्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन महाविद्यालयांनी/विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी त्यांचे स्तरावर करावे.

१३) महाविद्यालयाचे/विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा येथील प्राचार्य/विभागप्रमुख/मानद संचालक परीक्षेकरीता केंद्राधिकारी म्हणुन कार्य करतील. अपरिहार्य परिस्थितीमध्ये प्राचार्य/विभागप्रमुख/मानद संचालक वरिष्ठ शिक्षकाची केंद्राधिकारी म्हणुन नियुक्ती करतील व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना कळवतील.

१४) हिवाळी-२०२१ परीक्षेकरीता कोणत्याही परीक्षा केंद्रावर विद्यापीठाकडून सहकेंद्राधिका-यांची नियुक्ती करण्यात येणार नाही.

१५) ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेली आहेत, परंतु काही कारणाने अशा विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक प्राप्त झालेली नसतील, अशावेळी विद्यापीठाकडून केंद्राधिका-यांनी दूरध्वनीद्वारे Adding Roll No. परीक्षा विभागातील संबंधित विभागाचे नियंत्रण व पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावेत. परीक्षा क्रमांक महाविद्यालयाने आपल्या स्तरावर देवू नये.

१६) परीक्षा संचालनाच्या काळात विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य हित लक्षात घेता, प्रत्येक परीक्षा केंद्रावर कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे बॅनर ठळकपणे परीक्षा केंद्राच्या दर्शनी भागात लावण्यात यावे.

१७) श्रेणी सुधार (Improvement of Division) (अध्यादेश क्र.६/२००८) या सवलतीअंतर्गत उन्हाळी-२०२०, हिवाळी-२०२०, उन्हाळी-२०२१ आणि हिवाळी-२०२१ परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेले विद्यार्थी या परीक्षेकरीता पात्र राहतील. सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन कोविड-१९ पूर्वीच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे करण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा केंद्रांवर होईल. प्रत्येक जिल्ह्याकरीता एक परीक्षा केंद्र देण्यात येईल व त्याचे स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करण्यात येईल. सदर परीक्षांकरीता प्रश्नपत्रिका विद्यापीठाद्वारे पुरविण्यात येतील.

१८) B.Ed. एक वर्षीय जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्या परिषदेच्या निर्णयानुसार परीक्षेकरीता एक विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. हे विद्यार्थी हिवाळी-२०२१ परीक्षेकरीता पात्र राहतील. सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन कोविड-१९ पूर्वीच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे करण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा केंद्रांवर होईल. प्रत्येक जिल्ह्याकरीता एक परीक्षा केंद्र देण्यात येईल व त्याचे स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करण्यात येईल. सदर परीक्षांकरीता प्रश्नपत्रिका विद्यापीठाद्वारे पुरविण्यात येतील.

१९) उन्हाळी-२०२१ परीक्षेतील अंतिम वर्ष व अंतिम सत्र वगळून इतर वर्षांच्या/सत्रांच्या ज्या नियमित विद्यार्थ्यांचे निकाल ५० टक्के अंतर्गत सत्र गुण व ५० टक्के लगतच्या सत्राच्या गुणांचे आधारे जाहीर करण्यात आलेले आहेत परंतू सदर निकाल विद्यार्थ्यांना समाधानकारक वाटत नाहीत/मान्य नाहीत असे विद्यार्थी त्याच परीक्षांकरीता हिवाळी-२०२१ करीता पात्र राहतील.

२०) महाविद्यालयीन स्तरावर पार पडलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका व Answer-Key ची एक प्रत महाविद्यालयांना विद्यापीठामध्ये सादर करावी लागेल.

## ब) परीक्षांचे वेळापत्रक :-

२१) हिवाळी-२०२१ परीक्षांच्या संचालनासंदर्भात परीक्षेचा कालावधी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र. | अभ्यासक्रमांचे नांव | प्रात्यक्षिक परीक्षेचा कालावधी | लेखी परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी व तांत्रिकी आणि फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षा विषम सत्र व अंतिम सत्र | दिनांक २२/१२/२०२१ ते ३०/१२/२०२१ | दिनांक १३/०१/२०२२ ते २७/०१/२०२२ |
| २ | अभियांत्रिकी व तांत्रिकी आणि फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सम सत्र (अंतिम सत्र वगळून)<br>(महाविद्यालय स्तरावर) | दिनांक २२/१२/२०२१ ते ३०/१२/२०२१ | दिनांक १३/०१/२०२२ ते २७/०१/२०२२ (अंतिम सत्र वगळून) |
| ३ | अ.क्र.१ व २ वरील परीक्षांव्यतिरिक्त उर्वरित अभ्यासक्रमांचे विषम सत्र व अंतिम वर्ष / अंतिम सत्र | सबंधीत अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा संपल्यानंतर १ आठवड्यात पूर्ण करावी. | दिनांक २२/०१/२०२२ ते १२/०२/२०२२ |
| ४ | अ.क्र.१ व २ वरील परीक्षांव्यतिरिक्त उर्वरित अभ्यासक्रमांचे सम सत्र (अंतिम वर्ष / अंतिम सत्र वगळून) (महाविद्यालय स्तरावर) | सबंधीत अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा संपल्यानंतर १ आठवड्यात पूर्ण करावी. | दिनांक २२/०१/२०२२ ते १२/०२/२०२२ |
| ५ | केंद्रीय प्रवेश समितीद्वारे होणा-या प्रवेशाच्या अभ्यासक्रमाची आणि थेट द्वितीय वर्षाला प्रवेशित होणा-या अभ्यासक्रमाची तसेच अभियांत्रिकी व तांत्रिकी पदवी अभ्यासक्रमातील सत्र-१ व २ ची परीक्षा दिनांक ३०/०१/२०२२ च्या पुढे विद्यापीठ स्तरावर संचालित करण्यात येईल. | | |

२२) विद्यापीठाद्वारे जाहीर झालेल्या लेखी परीक्षेचे वेळापत्रक, प्रात्याक्षिक परीक्षेचा कालावधी, परीक्षा घेतांना कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी व परीक्षेची पद्धत इत्यादीबाबत महाविद्यालयाने / विद्यापीठ शैक्षणिक विभागाने विद्यार्थ्यांना त्यांचे स्तरावर अवगत करून द्यावे.

२३) अनुक्रमांक १,३,५ वरील परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाद्वारे जाहीर करण्यात येईल. विद्यापीठाद्वारे जाहीर झालेल्या लेखी परीक्षेचे वेळापत्रक, प्रात्याक्षिक परीक्षेचा कालावधी परीक्षेला येतांना कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी व परीक्षेची पद्धत इत्यादीबाबत महाविद्यालयाने/विद्यापीठ शैक्षणिक विभागाने विद्यार्थ्यांना त्यांचे स्तरावर अवगत करून द्यावे.

२४) दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता यापूर्वीच्या प्रचलीत पद्धतीप्रमाणे विहित अध्यादेशानुसार अतिरीक्त वेळ देण्यात येईल.

## क) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व सोडविण्याबाबतची माहिती :-

२५) प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये संपूर्ण अभ्यासक्रमांवर आधारित प्रत्येक युनिटवर साधारणतः समान संख्येने बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात एकुण ४० प्रश्न राहतील. त्यापैकी सर्व प्रश्न विद्यार्थ्यांना सोडविणे बंधनकारक राहील.

२६) प्रत्येक प्रश्नाला प्रत्येकी दोन गुण राहतील.

२७) परीक्षेचा कालावधी हा प्रत्येक प्रश्नपत्रिकेकरीता ६० मिनीटांचा राहील (एक तास)

२८) चुकीच्या उत्तरांसाठी Negative marking पद्धती असणार नाही

## ड) प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक/अंतर्गत परीक्षेबाबत :-

२९) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयांने / विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढणा यांनी त्यांचे स्तरावर कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाद्वारे जाहीर मार्गदर्शक तत्वांचे पालन करून

ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने आयोजीत करावयाचे असून त्याकरीता बाह्य परीक्षकाची नियुक्ती न करता महाविद्यालयातील/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढणा येथील विषय शिक्षकांची नियुक्ती करून परीक्षा घेण्यात याव्यात व प्रात्याक्षिक परीक्षांचे गुण प्रचलित पद्धतीने ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने तातडीने विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे.

३०) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रकल्प परीक्षा (Dissertation/Project) ह्या सुद्धा प्रचलित पद्धतीने महाविद्यालयाने आयोजीत कराव्यात.

३१) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रकल्प परीक्षांना (Dissertation/Project) मौखिक परीक्षा (Viva voce) नाही परंतु प्रकल्प अहवाल परीक्षकाकडून मुल्यांकित करून घ्यावयाचे आहेत अशा परीक्षांचे निकाल परीक्षकाकडून प्रकल्पाचे मुल्यांकन होवून आल्यानंतर जाहीर करण्यात येईल.

३२) ज्या पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमातील परीक्षांकरीता प्रकल्पाला Viva voce आहेत त्या प्रकल्प परीक्षा बाह्य परीक्षकांची नियुक्ती न करता महाविद्यालयांच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या/मॉडेल डीग्री कॉलेज बुलढाना यांनी त्यांच्या स्तरावर अंतर्गत परीक्षकाची नियुक्ति करून घेण्यात याव्यात.

३३) प्रात्याक्षिक परीक्षांकरीता बाह्य परीक्षकाची नियुक्ती करण्यात येवू नये. या सर्व प्रात्याक्षिक परीक्षा या अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती करून घेण्यात याव्यात.

३४) संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी / विद्यापीठ विभागाच्या विभाग प्रमुखांनी / मानद संचालक यांनी प्रमाणित केलेले प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण, विद्यापीठाने महाविद्यालयाला / विद्यापीठ शैक्षणिक विभागाला / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांना पुरविलेल्या लॉगीनमध्ये/परीक्षा व विषय निहाय कंट्रोल शिट्स (ग्रीन व ब्लॅक) मध्ये नमूद केलेल्या तारखेला विद्यापीठाकडे सादर कराव्यात.

३५) शैक्षणिक सत्र-२०२१-२२ चे विषमसत्र (Odd Semester) अभ्यासक्रम ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने सुरू असल्यामुळे अंतर्गत गुणांचे मुल्यांकन Online/Offline पद्धतीने करावे.

३६) शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील हिवाळी-२०२१ परीक्षेकरीता प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) महाविद्यालयांनी प्रचलित पद्धतीनुसार विद्यापीठास सादर करावेत.

### इ) परीक्षांचे निकाल जाहिर करण्याबाबतची कार्यवाही :-

३७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने सोडविलेल्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन संबंधित महाविद्यालयाच्या / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा च्या प्राचार्यांनी/विभागप्रमुखांनी/मानद संचालकांनी त्यांना विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या Answer-Key वरुन संबधित विषय शिक्षकांकडून करुन घ्यावे व गुण विद्यापीठाला उपलब्ध करून दिलेल्या प्रपत्रामध्ये पाठवावे.

३८) मूल्यांकन झाल्यानंतर प्रचलित पद्धतीनुसार ऑनलाईन पोर्टलवर / ऑफलाईन पद्धतीने ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्वर विद्यापीठाने दिलेल्या मुदतीमध्ये गुण विद्यापीठात सादर करावेत. जी महाविद्यालये विहित मुदतीत गुण विद्यापीठाकडे सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांवर निदेश क्र.२३/२०१५ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

३९) मूल्यांकनानंतर विद्यार्थ्यास मिळालेले गुण हे त्या परीक्षेच्या स्किमनुसार असलेल्या एकुण गुणांपैकी रुपांतरीत करुन मिळालेले गुण ऑनलाईन/ऑफलाईन कंट्रोलशिटमध्ये भरावेत.

### ई) समुपदेशन

४०) विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी मार्गदर्शन करण्याकरीता मा.कुलगुरु व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे मार्गदर्शनपर उद्बोधनाची व्हीडीओक्लीप तयार करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात यावी. तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

## भाग-२

### अ) महाविद्यालयातील/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील परीक्षा केंद्रावर कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य हित लक्षात घेता, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.:-

i) परीक्षा केंद्रावरील सफाईगारांना व संबंधितांना स्वच्छता व निर्जंतुकीकरण (Periodic Sanitization) प्रशिक्षित करण्यात यावे.

ii) सर्व महाविद्यालयांनी / विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी त्यांचे परीक्षा केंद्रावर मुख्य वाहतुक रस्त्याने व परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या आतील व बाहेरील भागांची औषध फवारणीद्वारे नियोजीत कालावधीत निर्जंतुकीकरण करावे.

iii) परीक्षा केंद्रावर, प्रशासकीय विभागात आणि परीक्षा गृहात Hand Sanitizer व Handwash ची व्यवस्था करण्यात यावी.

iv) परीक्षा केंद्रावर परीक्षा संचालनादरम्यान कार्य करणारे शिक्षक, पर्यवेक्षक, वॉटरमन व इतर सर्व कर्मचारी यांना Mask शिवाय प्रवेश निषिद्ध राहील. तसेच सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना Mask वापरण्याबाबत महाविद्यालयाने आपले स्तरावर न चुकता अवगत करावे.

v) विद्यार्थ्यांची खोलीनिहाय बैठक व्यवस्था ही Physical Distancing चे पालन होईल, या पद्धतीने करण्यात यावी.

vi) Thermal Scanner ची व्यवस्था शक्य असल्यास करण्यात यावी.

vii) परीक्षा केंद्रावर वॉटर कुलर व प्रसाधन गृहाचा वापर बाहेरील कोणतीही व्यक्ती करणार नाही, याची पुर्णपणे दक्षता घेण्यात यावी.

viii) परीक्षा केंद्रावरील उपहार गृहामध्ये सुद्धा उपरोक्तप्रमाणे प्रतिबंधात्मक व्यवस्था करणे आवश्यक राहील, तसे निर्देश संबंधीत व्यवस्थापकास देण्यात यावे.

ix) परीक्षा केंद्रावर वापरण्यात येणारे Disposable Mask व Hand Gloves सुरक्षितपणे नष्ट करण्याची काळजी घेण्यात यावी.

x) कोविड-१९ प्रभाव थुंकीतूनही होत असल्यामुळे परीक्षा केंद्राच्या इमारतीमध्ये व परिसरात कुणीही थुंकणार नाही, याबाबतची विशेष काळजी घेण्यात यावी, जर असे आढळल्यास संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

xi) परीक्षा केंद्रावरील / महाविद्यालयाचे / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या इमारतीमध्ये व परिसरामध्ये दर्शनी भागावर कचरा पेटी ठेवण्यात यावी.

xii) कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्याकरीता शासनाद्वारे/U.G.C., A.I.C.T.E इत्यादी शिखर संस्थेद्वारे प्राप्त निर्देशानुसार तसेच निर्गमीत मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन करुन इतरही बाबींचा अवलंब करण्यात यावा.

xiii) महाविद्यालयांमध्ये/परीक्षा केंद्रावर/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये निर्जंतूकीकरण व्यवस्था व बैठक व्यवस्था ही शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार महाविद्यालयांद्वारे करण्यात यावी. निर्जंतूकीकरणासाठी प्रति विद्यार्थी खर्च विद्यापीठाद्वारे देण्यात येईल.

**ब) ऑनलाईन व्यवस्था निर्माण करणे व मूल्यांकनासंबंधी करावयाची कार्यवाही:-**

i) प्रत्येक महाविद्यालयात/विद्यापीठ शैक्षणिक विभागात/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा येथे प्रश्नपत्रिकेकरीता Online link तयार करण्याकरीता व मूल्यांकन कार्य करण्याकरीता आवश्यकतेनुसार स्वतंत्र कक्ष तयार करुन याबाबतचे संपूर्ण कामकाज प्राचार्य/केंद्राधिकारी/विभागप्रमुख/मानद संचालक यांचे नियंत्रणाखाली व देखरेखीखाली करण्यात यावे व सदर कार्य गोपनीयतेचा भंग होणार नाही, याबाबतची दक्षता घेवून पार पाडावे.

ii) महाविद्यालयाने/विद्यापीठ शैक्षणिक विभागाने/ मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी महाविद्यालयातच/विद्यापीठ शैक्षणिक विभागातच मूल्यांकन केंद्र आवश्यकतेनुसार स्थापित करुन त्या ठिकाणीच मूल्यांकन करणे अनिवार्य राहील.

iii) परीक्षाचे मूल्यांकन झाल्यानंतर त्या-त्या विषयाचे गुण विद्यापीठाने पुरविलेल्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्समध्ये प्राचार्य/केंद्राधिकारी/विभागप्रमुख/मानद संचालक यांच्या देखरेखीखाली भरावे.

iv) विषयाचे गुण सारणीकारांकडून कंट्रोलशिट्स मध्ये भरल्यानंतर प्राचार्य/केंद्राधिकारी/विभागप्रमुख यांनी रॅन्डम (Random) पद्धतीने तपासून घ्यावेत.

v) संपूर्ण परीक्षांचे मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागप्रमुखाच्या/मानद संचालकांच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी सिलबंद लिफाफ्यात लेखी परीक्षेच्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्स मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे विहित मुदतीत पाठविण्यात याव्यात. तसेच लिफाफ्यावर महाविद्यालयाचे नाव/विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे नांव, परीक्षेचे नांव व विषयाचे नांव ठळकपणे नमूद करावे.

vi) Online Service Provider यांच्या पोर्टलद्वारे संचालित होणा-या परीक्षेसंदर्भात महाविद्यालयांनी लेखी परीक्षेचे अंतर्गत गुण, प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण व लेखी परीक्षेचे गुण आपल्या महाविद्यालयाच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांच्या लॉगीनने ऑनलाईन पोर्टलमध्ये अचुकतेने ऑनलाईन द्वारे भरण्यात यावे. याबाबीची अधिक दक्षतेने व गांभिर्याने काळजी घ्यावी, व तसेच पोर्टलवर भरलेल्या गुणांची Soft Copy मूल्यांकन केंद्रातच संग्रहित करुन ठेवावी.

vii) परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेट देण्याकरीता विद्या परिषदेचे सदस्य आपल्या सोईनुसार एका नियमित महाविद्यालयीन शिक्षकाला सोबत घेऊन विद्यापरिषदेचे सदस्य ज्या जिल्हयात कार्यरत आहेत. त्या जिल्हयातील परीक्षा केन्द्रांना परीक्षे दरम्यान भेटी देतील व प्रचलित पध्दतीने केन्द्र भेटीचा अहवाल सादर करतील.

**क) परीक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती-**

i) परीक्षा केंद्रावर होणा-या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांने अथवा इतरांनी गैरमार्गाचा अवलंब केल्यास, अशी सर्व प्रकरणे विद्यापीठाने महाविद्यालयास पुरविलेल्या विहित प्रपत्रात आवश्यक ती माहिती भरुन त्वरित सहाय्यक कुलसचिव (गोपनीय), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

**ii)** महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली परीक्षेमधील गैरमार्गाची सर्व प्रकरणावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील कलम ४८(५)(ख ) नुसार परीक्षेच्या गैरव्यवहारात किंवा गैरप्रकारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असणा-या संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**ड) महाविद्यालयीन / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या स्तरावर ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षेच्या संचालनाकरीता खालीलप्रमाणे खर्च देय राहील.**

**-तक्ता-**

| अ.क्र. | परीक्षा केंद्रावरील अधिकारी/ कर्मचारी/व्यवस्था | मानधन/परिश्रमिक (प्रतिदिन) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी संख्या | द्यावयाचे मानधन | विद्यार्थी संख्या | द्यावयाचे मानधन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | परीक्षा केंद्राधिकारी Online/Offline | --- | रु.५००/- (प्रतिदिन) | --- | -- |
| २ | पर्यवेक्षक Online/Offline | १-३५ विद्यार्थ्यामागे प्रतिपाळी | रु.१५०/- | -- | -- |
| ३ | लिपीक Online/Offline | प्रतिदिन | रु.२००/- | -- | -- |
| ४ | शिपाई Online/Offline | प्रतिदिन | रु.१००/- | -- | -- |
| ५ | वाटरमन Offline | १-१०० पर्यंत प्रतिपाळी | रु.७५/- | पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे प्रतिपाळी | रु.५०/- |
| ६ | सफाईगार Offline | प्रति १०० विद्यार्थ्यामागे | रु.१५० | -- | -- |

| | | |
|---|---|---|
| ७ | Offline परीक्षेकरीता प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करणे व गुण भरणे. | प्रति विद्यार्थी व प्रति पेपर रुपये १०/- किंवा<br>कमित कमी रुपये २००/-<br>यापैकी जी रक्कम जास्त असेल ती देय राहील. |
| ८ | निर्जंतूकीकरण व्यवस्था Offline<br>(प्रति दिवस) | १ ते १०० विद्यार्थ्यांकरीता रुपये ५००/-<br>१०१ ते २०० विद्यार्थ्यांकरीता रुपये ७५०/-<br>२०० वर विद्यार्थ्यांकरीता रुपये १०००/- |
| ९ | Offline परीक्षेकरीता प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स काढणे | प्रति विद्यार्थी प्रती पेपर रुपये ४.००/- |
| १० | ऑनलाईन प्रश्नपत्रिका व्यवस्था निर्माण करणे.<br>(पोर्टलवर/कंट्रोलशिटवर गुणदान करणे) | प्रति विद्यार्थी व प्रति पेपर रुपये १०/- किंवा<br>कमित कमी रुपये १००/-<br>यापैकी जी रक्कम जास्त असेल ती देय राहील. |
| ११ | स्टेशनरी खर्च Online/Offline | प्रति विद्यार्थी रुपये ०४/- |

उपरोक्त परीक्षा पद्धती कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर असलेली सद्यस्थिती व त्याअनुषंगाने शासनाचे मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि, सदर परिस्थितीत बदल झाल्यास व त्याअनुषंगाने शासनाकडून निर्देश/सूचना प्राप्त झाल्यास त्यानुसार परीक्षा कार्यपद्धती व संचालनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार तसेच वरील कार्यपद्धतीत समाविष्ट नसलेल्या बाबींवर निर्णय घेण्याचा व कार्यवाही करण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना प्रदान केलेत.

(**टिप :-** (१) उपरोक्त कार्यपद्धतीनुसार परीक्षा संचालन सुचारु पद्धतीने पार पाडण्यासाठी लागणा-या सूचना परीक्षा विभागाद्वारे आवश्यकतेनुसार निर्गमीत करण्यात येतील.

(२) याशिवाय विद्यार्थ्यांना उपरोक्त परीक्षांसंदर्भात काही अडचणी असल्यास, त्या त्यांनी विद्यापीठाचा WhatsApp No.9356800673/exam2020@sgbau.ac.in वर मेसेज स्वरुपात कळवाव्यात. विद्यापीठाद्वारे त्यांचे निरसन करण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येईल.)

*****